सयाजी ज्ञानमाला : ३

# महाराजा सयाजीराव आणि राजर्षी शाहू

## दिनेश पाटील




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

सयाजी ज्ञानमाला : ३

# महाराजा सयाजीराव
# आणि
# राजर्षी शाहू

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि राजर्षी शाहू
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - २३
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

सयाजी ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
फ्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५५ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**सयाजी ज्ञानमाला**
**ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# राजर्षी शाहू

बडोदा आणि कोल्हापूर ही भारतातील दोन प्रागतिक संस्थाने आहेत. विशेष म्हणजे ही दोन्ही मराठी संस्थाने ज्याप्रमाणे पुरोगामी धोरणांच्या दृष्टिकोनातून परस्परांशी संवादी नाते ठेवून होती त्याचप्रमाणे रक्तसंबंधांच्या दृष्टीनेही या दोन संस्थानांचा ८२ वर्षांचा प्रदीर्घ ऋणानुबंध होता. या दोन संस्थानांच्या संबंधाने लेखन-संशोधन न झाल्याने हा इतिहास महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा असला तरी अज्ञात आहे. सयाजीराव आणि शाहू यांच्या प्रागतिक धोरणांमध्ये असणारे कमालीचे साम्य व प्रागतिक कोल्हापूरच्या जडणघडणीसाठी बडोद्याने पुरवलेल्या ज्ञानऊर्जेची दखल आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासकारांबरोबरच शाहू इतिहासकारांनीही अजिबात घेतली नाही. त्यामुळे बडोद्याने आणि सयाजीरावांनी महाराष्ट्राला काय दिले हे आपल्याला माहीत नाही. महत्त्वाचे म्हणजे शाहू महाराजांनी कोल्हापूरचा पुरोगामी वारसा बडोद्याकडून घेतला होता हा एक 'जाणीवपूर्वक' अंधारात ठेवलेला इतिहास आहे.

सयाजी-शाहू पत्रव्यवहार चाळला तरी महाराजा सयाजीराव शाहू महाराजांसाठी 'फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड' होते या ऐतिहासिक सत्यावर पूर्ण प्रकाश पडतो.

'ब्राह्मणांनी आमचा इतिहास चुकीचा लिहिला म्हणून आम्ही नव्याने आमचा इतिहास लिहित आहोत' असे म्हणत लिहिलेला पुरोगामी इतिहास जेव्हा सयाजीरावांना 'कात्रजचा घाट' दाखवतो तेव्हा आमचा हा 'पुरोगामी इतिहास लिहिला नसता तर बरे झाले असते' अशी पश्चात्ताप करण्याची वेळ येते. आपण जेव्हा सयाजीरावांची धोरणे, कायदे आणि उपक्रम समजून घेतो त्यावेळी या सर्व सोयीस्करपणाचा उलगडा होतो. त्यामुळेच सयाजी-शाहू या वैचारिक ऋणानुबंधातील सर्व चढ-उतार 'जसे घडले तसे' आणि संजय सुब्रमण्यम यांच्या 'जोडलेला इतिहास' (Connected History) या संकल्पनेच्या आधारे जोडून-समजून घेतले तर आपला एक अत्यंत धक्कादायक पुरोगामी आणि खरा इतिहास स्पष्टपणे पुढे येतो जो अत्यंत वैभवशाली आणि आपल्याला संवादाची परंपरा आहे याची जाणीव अधोरेखित करणारा ठरतो.

आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामित्वाचे 'फुले-शाहू-आंबेडकर' मॉडेल गेली ६० वर्षे महाराष्ट्राचे बौद्धिक नेतृत्व करत आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या सर्वोच्च मानवी मूल्यांचे जणू ते प्रतीकच बनले आहे. आपण जेव्हा या तीन्हीही महापुरुषांच्या जीवनकार्याचा शोध घेऊ लागतो तेव्हा या

महापुरुषांच्या विचार आणि कार्यातील परस्परसंबंध आपण आग्रहाने मांडत असतो. परंतु या तिघांच्याही जीवनातील समकालीन संदर्भ तपासले असता महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याशी या तिघांचा सकारात्मक आणि रचनात्मक सामाजिक संवाद होता याचे असंख्य पुरावे उपलब्ध असल्याचे आढळते. त्या दृष्टीने महात्मा फुल्यांच्या जीवनकार्यातील सयाजी संदर्भ शोधल्यानंतर जेव्हा आपण शाहू महाराजांचा सयाजीरावांशी नेमका कसा संवाद होता हे शोधण्याचा प्रयत्न करतो तेव्हा अनेक सुखद धक्के बसतात.

## सयाजीरावांचे समकालीन : राजर्षी शाहू

सयाजीराव वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत नाशिक जिल्ह्यातील कवळाण्यासारख्या छोट्या गावात पाटीलकीचे वतन असणाऱ्या सामान्य शेतकरी कुटुंबात वाढले होते व ते दत्तक जाईपर्यंत निरक्षर होते. गावातील सर्व जातीधर्माच्या गोरगरीब सवंगड्यांमध्ये सयाजीरावांचे बालपण गेले. बडोद्याला दत्तक गेल्यानंतर सर इलियटसारख्या व्यापक दृष्टी असणाऱ्या शिक्षकाचा सहवास, उपजत चौकस बुद्धी, कष्ट आणि वाचन यातून सयाजीरावांमधील समाजक्रांतिकारक अतिशय गांभीर्याने घडला. सयाजीराव बडोद्याच्या गादीवर महाराष्ट्रातून १८७५ ला दत्तक गेले आणि १८८१ ला त्यांनी बडोद्याचा राज्यकारभार हाती घेतला. त्यावेळी सयाजीरावांचे वय १८ वर्षे होते.

तर शाहू महाराज १८९४ ला कोल्हापूर संस्थानातील कागल येथून कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले आणि त्याचवर्षी राज्यकारभाराचे अधिकार त्यांना प्राप्त झाले. त्यावेळी शाहू महाराजांचे वय २० वर्षे होते. म्हणजेच एका अर्थाने हे दोन महान राजे समकालीन होते. सयाजीरावांना ६४ वर्षे असा प्रदीर्घ काळ राज्यकारभार करता आला. दुर्दैवाने शाहू महाराजांना अवघी २८ वर्षे राज्यकारभार करता आला. शाहूंना दीर्घायुष्य लाभले असते तर त्यांनी बडोद्याची 'प्रतिसृष्टी' कोल्हापुरात उभी केली असती हे त्यांच्या लढवय्या स्वभावावरून निश्चितपणे म्हणता येईल.

सयाजीरावांनी आपल्या पुरोगामी राज्यकारभाराला शाहू महाराजांच्या आधी १३ वर्षे आरंभ केला. महाराजा सयाजीराव आणि शाहू महाराज हे दोघे परस्परांचे नातेवाईक होते. या दोघांमधील पुरोगामी वैचारिक संवाद १९०० च्या कोल्हापुरातील वेदोक्तापासून ते १९२२ मध्ये राजर्षी शाहूंच्या निधनापर्यंत म्हणजे २२ वर्षांचा होता. या २२ वर्षातील सयाजी-शाहू संबंध समजून घेणे आणि शाहूंच्या पुरोगामी धोरणातील 'सयाजीविचार' अधोरेखित करणे हाच उद्देश या चर्चेमागे आहे. या दोघांच्या एकूण जीवनप्रवासाचा विचार करता सयाजीरावांच्या वाट्याला इंग्रजांशी तीव्र संघर्ष आणि ब्राह्मणी व्यवस्थेशी तुलनेने सौम्य संघर्ष तर शाहूंच्या बाबत ब्रिटिशांशी संवाद तर ब्राह्मणी व्यवस्थेशी जीवघेणा संघर्ष आढळतो. वेदोक्ताने शाहू महाराजांमधील समाजक्रांतिकारक जन्माला घातला. तर अशा

कोणत्याही अपमानकारक अनुभवाशिवाय सयाजीरावांमधील समाजक्रांतिकारक राष्ट्र उन्नतीच्या विशाल ध्येयातून विकसित झाला.

### महाराजा सयाजीराव-राजर्षी शाहू : तुलनात्मक 'आकलन'

सयाजीराव महाराज आणि राजर्षी शाहू या दोन महान राजांची तुलना महाराष्ट्रातील शाहू प्रेमींना कदाचित अतिरेकी आणि अनावश्यक वाटेल परंतु महाराष्ट्राचा पुरोगामी वारसा समजून घेण्यासाठी ती अनिवार्य ठरते. या दोन्ही राजांचा तुलनात्मक अभ्यास फार पूर्वीच व्हायला हवा होता. परंतु सयाजीरावांना 'बडोद्याचे' म्हणून आम्ही दुर्लक्षित ठेवले. दोघांकडेही काम केलेल्या वि. द. घाटे या शिक्षणतज्ज्ञाने त्यांच्या 'दिवस असे होते' या आत्मकथनात या दोघांची अत्यंत चित्तवेधक तुलना केली आहे. अलीकडे शाहू गौरव ग्रंथासाठीच्या लेखात बाबा भांड यांनी घाटेंच्या तुलनेचा अधिक विस्तार त्यांनीच शोधलेल्या नव्या संदर्भांच्या आधारे केला आहे. प्रस्तुत तुलना ही मुख्यत: पुरोगामी महाराष्ट्राचे ऊर्जाकेंद्र बडोदा कसे होते हे शोधणे या मर्यादित भूमिकेतून आणि या दोघांचे बोट धरून केली आहे.

या तुलनात्मक शोधाच्या आरंभी वि.द. घाटे यांनी या दोघांच्या स्वभावाच्या अंगाने केलेली तुलना विचारात घेऊ. वि.द. घाटे म्हणतात, "शाहूमहाराज आणि सयाजीराव महाराज हे दोघे राजपुरुष बरेचसे समकालीन. दोन्हीही मोठी माणसे; परंतु दोघात फार फरक होता. पहिले दहा - दहा तास उन्हातान्हात घोड्यावर

बसून डुकरांचा माग काढायचे, तर दुसरे दहा - दहा तास नव्या नव्या शास्त्रांवरील ग्रंथांचे श्रवण करीत जागरण करायचे. एखादा प्रश्न डोकावला रे डोकावला की पहिले त्याला ताबडतोब कार्यवाहीत आणायचे. दुसरे स्वतःचे मत निश्चित असले तरी चार तज्ज्ञांची कमिटी नेमायचे. त्यांना पुरेसा वेळ द्यायचे. त्यांचा अहवाल सावकाश वाचायचे. चर्चा करायचे आणि मगच निर्णय घ्यायचे. सयाजीरावांपाशी जन्म काढलेले माझे मित्र मला थट्टेने नेहमी सांगत, एखाद्या माणसाने राजवाड्यात येऊन, समोर उभे राहून महाराजांना शिव्या दिल्या असत्या तर सदर इसमाने खरेच शिव्या दिल्या का, दिल्या असल्यास त्या किती वाईट होत्या, शिव्या वाईट असल्यास सदर इसमास काय शिक्षा करावी, हे ठरविण्यासाठी महाराजांनी एखादी कमिटी नेमली असती.” वि.द. घाटेंचे हे विश्लेषण वाचल्यानंतर या दोघांच्या स्वभावातील दोन टोकांचे आपल्याला दर्शन घडते.

वि.द.घाटेंनी पुढे ही तुलना अधिक मूलभूत पातळीवर नेली आहे. शाहूंना ते कर्मवीर म्हणतात तर सयाजीरावांना तत्त्वचिंतक. ही तुलना अत्यंत रंजक तर आहेच आहे परंतु दोघांच्या कार्याचा वैचारिक पाया स्पष्ट करणारीही आहे. घाटे म्हणतात, “पहिले कर्मवीर तर दुसरे तत्त्वचिंतक. पहिले कर्मठ मराठा-हिंदू होते. क्षत्रियत्त्वाचा अभिमान बाळगणारे, मरेपर्यंत सकाळी भक्तिभावाने (विलायतच्या थंडीतसुद्धा) शिवपूजा करणारे होते, तर दुसरे अज्ञेयवादी, बुद्धीखेरीज कशावरच विश्वास न ठेवणारे;

परंतु लोकाराधनेसाठी सारे काही करणारे आणि करविणारे होते. पहिले कट्टर ब्राह्मणेतर, तर दुसरे भारतीयत्वाच्याही पलीकडे जाऊन विश्वमानव बनलेले, विश्वसंस्कृतीशी तादात्म्य पावलेले आणि भारतीय संस्कृतीकडे तटस्थ वृत्तीने पाहणारे होते. पहिल्याने आपले संस्थान क्वचितच सोडले तर दुसरे आपल्या संस्थानातच नव्हे तर आपल्या देशात हिवाळ्याच्या मोसमाखेरीज क्वचितच राहिले. मात्र अस्मानात उडणाऱ्या घारीची नजर खालच्या घरट्यातल्या पिलांवर असते तशी सयाजीरावांची नजर सदैव आपल्या प्रजेकडे होती. सयाजीराव कोणाच्याच जवळ आले नाहीत. कोणालाच त्यांनी जवळ केले नाही. बायकोला, मुलांना, नातवांना, मित्रांना. ते स्वयंकेंद्रित होते, 'इंट्राव्हर्ट' होते तर शाहू महाराज 'एक्स्ट्राव्हर्ट' होते. इतका मोठा फरक होता; परंतु दोघेही आपल्या तेजाने तळपले आणि भारताचे भूषण झाले." घाटेंनी अत्यंत मार्मिकपणे दोघांच्या व्यक्तिमत्त्वाचा 'एक्स-रे' काढला आहे.

शाहू महाराज हे एखाद्या वादळाच्या झंझावातासारखे व्यक्तिमत्त्व तर सयाजीराव म्हणजे शीतल चांदणे. शाहू महाराज एखादा विचार पटला की त्याची तत्काळ अंमलबजावणी या धोरणाचे प्रवक्ते तर सयाजीराव मात्र परिणामाची तीव्रता आणि व्याप्ती याचा विचार करून कृती या धोरणाचे प्रवक्ते. दोघांच्या या स्वभावामुळे त्यांच्या सामाजिक कार्यावर फार मोठे परिणाम झाले. हे परिणाम जसे सकारात्मक होते तसे नकारात्मकही होते.

वि. द. घाटे आपल्या आत्मचरित्रात या दोघांची तुलना करताना शेवटी जे म्हणतात ते फार महत्त्वाचे आणि आपल्या पुढील विवेचनासाठी मार्गदर्शक आहे. घाटे म्हणतात, "तसे पाहिले तर शाहूमहाराजांनी जे जे केले ते सारे सयाजीराव महाराजांनी केले. इतकेच नव्हे तर त्यांच्यापूर्वीच केले. वेदोक्त सयाजीराव महाराजांनीच सुरू केले. शाहू महाराजांनी पुढे ते धसास लावले. सयाजीरावांनी आपल्या पंक्तीला अस्पृश्यांना घेतले. त्यांना नोकऱ्या दिल्या. आंबेडकरांच्या शिक्षणासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला; परंतु हे सारे केले ते अलिप्त वृत्तीने. आपल्या विशाल कार्यक्षेत्रातील आणि विशालतर जीवनातील केवळ एक भाग याच भावनेने आणि दृष्टीने. साहजिकच सयाजीरावांच्या सामाजिक किंवा जातीय कार्याचा गाजावाजा झाला नाही आणि त्यांच्यावर टीकेचा वर्षावही झाला नाही."

वि. द. घाटेंनी दोघांच्याही कार्याचे ऐतिहासिक मूल्यमापन केले आहे. कोल्हापुरातील अनेक सुधारणांचा उगम सयाजीरावांच्या धोरणात होता. याचे अनेक पुरावे शाहू महाराजांनी बडोद्याशी केलेल्या पत्रव्यवहारात सापडतात. परंतु या संदर्भात चर्चा मात्र झालेली नाही. ही चर्चा दोघांपैकी कोण श्रेष्ठ हे ठरविण्यासाठी नाही, पुरोगामी धोरणांच्या अंमलबजावणीत परस्पर पाठबळाची गरज असते. ही गरज इतिहासात कशी भागवली गेली होती हे तुलनेशिवाय समजत नाही. हे समजण्यासाठीच ही तुलना केली आहे. शाहू महाराजांना सयाजीराव वडीलधारे होते.

राज्याधिकार प्राप्त झाल्यापासूनच (१८८१) सयाजीरावांचा महाराष्ट्रातील सुधारणावादी महापुरुषांशी नियमित संपर्क होता. मामा परमानंद, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, गंगारामभाऊ म्हस्के, न्यायमूर्ती चंदावरकर, विठ्ठल रामजी शिंदे इ. सर्व समाजसुधारकांशी सयाजीरावांचा सातत्याने संवाद होता. महात्मा फुले यांनी समाजसुधारणेविषयी जो कार्यक्रम तयार केला होता तो महाराष्ट्राअगोदर सयाजीरावांनी बडोद्यात फक्त राबविलाच असे नाही तर फुल्यांच्या अपेक्षेपेक्षाही व्यापक केला.

वि.द. घाटेंप्रमाणेच बाबा भांड यांनी सयाजीराव आणि शाहू यांची तुलना करून काढलेला निष्कर्ष वरील मांडणीची पाठराखण करताना दिसतो. बाबा भांड म्हणतात, "महाराजा सयाजीराव आणि राजर्षी शाहू हे दोघेही समाजपुरुष लोककल्याण आणि समाजसुधारणांसाठी उत्तम प्रशासनाचा आदर्श होते, बुद्धिवादी होते, नवीन प्रयोग करण्यास मागे-पुढे पाहत नसत. सयाजीरावांचा मदतीचा हात अधिक मोकळा होता. वेगवेगळ्या जातीच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाचा शाहूंचा प्रयत्न हे चांगले उदाहरण सांगता येईल. शाहू छत्रपतींचे ब्रिटिश सरकारांशी असलेले मित्रत्वाचे संबंध आणि वागणे त्यांच्या समतोल व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. याउलट, एक व्यासंगी, विद्वानांच्या संगतीत वावरणारे आणि जगभर फिरलेले स्वाभिमानी सयाजीराव महाराज ब्रिटिशांची रणनीती पुरती

ओळखून आयुष्यभर संयमाने सरकारशी संघर्ष करत राहिले. हे करत असताना त्यांनी रयतेच्या कल्याणाचा चोवीस तास ध्यास घेतला. साहित्य, कला, संस्कृती, उद्योग, शेती आणि प्रशासनात बडोदा हे हिंदुस्थानातील अग्रगण्य संस्थान बनवले. शाहू महाराजांच्यापूर्वी महात्मा फुले व सत्यशोधक चळवळीकडे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी लक्ष दिले.

राजर्षी शाहू आणि महाराजा सयाजीरावांची पिंड व प्रकृती मूलतः भिन्न होती. राजर्षी शाहू एखादी गोष्ट करताना एकदम धडक मारत, टक्कर घेऊन प्रतिस्पर्ध्याला चारीमुंडी चीत करण्याची पहिलवानी शक्ती वापरत. याउलट, सयाजीराव महाराज एखादा निर्णय घेताना चार तज्ज्ञांचे मत घेत, त्यांच्याकडून अहवाल मागवत, स्वत: त्याचा विचार करून समतोल निर्णय घेत. तरीसुद्धा विद्याप्रसारक चळवळीचे सयाजीराव पहिले आश्रयदाते झाले. पुढे सयाजीरावांच्या कार्यात शाहू महाराजांनी भर घातली. सयाजीरावांचे धोरण सामिलकीचे असल्याने कट्टर हिंदुत्ववादी सावरकरवादी, फुल्यांचे सत्यशोधक, आर्यसमाजाचे, बुद्धिस्ट आणि पुरोगामी विचारांची माणसे त्यांच्याकडे नोकरीला होती. या सर्वांना बरोबर घेऊन सयाजीराव महाराजांनी सामिलकीच्या धोरणाचा पुरस्कार केला. महाराष्ट्रालाच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाला गौरव आणि अभिमान वाटावा असे या दोघांचे कार्य आहे.”

वरील दोन अभ्यासकांच्या सयाजी-शाहू तुलनेचा पुढे विकास करायचा झाल्यास असे म्हणता येईल की, सयाजीराव हे कठोर बुद्धी आणि तर्क यांना अग्रक्रम देणारे होते. तर शाहू काहीसे भाबडे, थेट आणि मनात येईल ते तत्काळ तडीस नेण्यासाठी आग्रही भूमिका घेणारे आणि भावनिक होते. भावनिक असणे हे जरी संवेदनशीलतेचे लक्षण असले तरी प्रशासकाकडे बुद्धी आणि भावना यांचे संतुलन असावे लागते. महत्त्वाचे म्हणजे बुद्धी आणि भावना यातील काय निवडायचे असे द्वंद्व निर्माण झाले तर प्रशासकाला भावनांवर संयमी लगाम ठेवून बुद्धीला प्राधान्य द्यावे लागते तरच निर्णय आणि धोरण दीर्घ पल्ल्याचा सकारात्मक परिणाम घडवून आणू शकतात.

## बडोदा : पुरोगामी कोल्हापूरचे 'ऊर्जाकेंद्र'

राजर्षी शाहूंचा देदीप्यमान इतिहास आपण गेली ६० वर्षे अभ्यासत आहोत. गेल्या २० वर्षांत शाहू संशोधनाचा परमोच्च विकास महाराष्ट्रातील तथाकथित इतिहास संशोधकांनी जिद्दीने केला. त्याचे कौतुक केलेच पाहिजे. परंतु महापुरुषांना 'सुपरमॅन' म्हणून सादर करण्याची स्पर्धा फारच केविलवाणी आणि मनोरंजक आहे. कारण महापुरुषांनी परस्परांचे हात पकडून 'विषमतेचा महापूर' पार करण्याची जीवघेणी लढाई प्राणपणाने लढली असताना अभ्यासक, अनुयायी, भक्त आणि संशोधक यांनी मात्र आपापल्या जातीच्या महापुरुषांवर 'खाजगी संपत्ती'सारखा दावा केला आहे.

हे महापुरुष समाजाचे असताना त्यांना एका जातीत किंवा एका कंपूत जखडून ठेवण्याची करामत आपल्या संशोधकांनी केल्यामुळे त्यांच्यातील संवाद आपण गाडून टाकला. परिणामी आपली परंपरा श्रीमंत होण्याऐवजी गरीब झाली. अनुयायी आणि संशोधकांनी महासागराचे डबके केले. त्यामुळेच आज पुरोगामी चळवळ नष्ट झाली. परिणामत: राजर्षी शाहूंच्या पुढे असणारा सयाजीरावांचा आदर्श आणि शाहूंनी सयाजीरावांचे केलेले शब्दश: अनुकरण शेकडो पुरावे उपलब्ध असतानाही पुढे आले नाही. म्हणूनच इतिहास जोडून अभ्यासण्याची गरज आहे. असे केले तर उपलब्ध इतिहास क्रांतिकारक स्वरूपात बदलतो. इतकेच नव्हे तर तो अधिक वस्तुनिष्ठपणे समोर येतो. याच भूमिकेतून शोध घेतला असता कोल्हापूरचे 'ऊर्जाकेंद्र' बडोदा असल्याचा सिद्धांत प्रस्थापित होतो.

सयाजीरावांनी १८८२ मध्ये अस्पृश्य आणि आदिवासींसाठी मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. या निर्णयाचे अनुकरण करत पुढे १९१८ मध्ये शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. सयाजीरावांनी त्यांच्या संस्थानातील सोनगड या ठिकाणी १८८२ ला अस्पृश्य व आदिवासींसाठी मोफत तसेच वसतिगृहाच्या विनामूल्य सुविधेसह हा निर्णय राबविला. पुढे ११ वर्षे या निर्णयाच्या अंमलबजावणीतील अडचणी अभ्यासून १८९३ मध्ये अमरेली प्रांतातील १० खेड्यांमध्ये सयाजीरावांनी

या प्रयोगाचा विस्तार केला. त्यामध्ये येणाऱ्या  अडचणी आणि त्यावरील उपाययोजना यांची परिपूर्ण तयारी करून त्यानंतर १३ वर्षांनी १९०६ मध्ये आपल्या संपूर्ण राज्यात सर्व जातीधर्मांच्या मुलामुलींकरिता मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा सयाजीरावांनी अमलात आणला.

शाहू महाराजांनी त्यांच्या धडाकेबाज स्वभावाला धरून १९१८ मध्ये प्रथम कोल्हापूर शहर आणि लगेचच संपूर्ण संस्थानात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अमलात आणला. पण बहुधा आर्थिक अडचणींमुळे तो फक्त मुलांसाठी लागू केला. मुलींना या कायद्याचा लाभ झाला नाही. या उदाहरणावरून दोघांच्या कार्यपद्धतीतील फरक स्पष्टपणे अधोरेखित होतो. यासंदर्भात रमेश जाधव महत्त्वाचे निरीक्षण नोंदवतात. ते म्हणतात, "...मुलांच्या सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणावर शाहू छत्रपतींनी जितके लक्ष केंद्रित केले होते तितके लक्ष त्यांनी मुलींच्या शिक्षणावर केंद्रित केल्याचे दिसत नाही. मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यातून मुलींना वगळण्यात आले होते."

१९१८ ला सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर पुढच्याच वर्षी शाहू महाराजांनी १९१९ ला संस्थानातील अस्पृश्य शाळा बंद करून स्पृश्यअस्पृश्यांच्या सहशिक्षणाचा धडाकेबाज निर्णय घेतला. याउलट बडोद्यात मात्र १८८२ पासून ते सयाजीरावांच्या निधनापर्यंत अस्पृश्यांच्या

शाळा पूर्ण क्षमतेने काम करत होत्या. अस्पृश्यांच्या शाळांबरोबर सहशिक्षणाचा पर्याय शाहू महाराजांच्या हुकूमाअगोदर ३१ वर्षे सयाजीरावांनी लोकांपुढे खुला ठेवला होता. उदाहरण म्हणून विचारात घ्यायचे झाल्यास १९१०-११ मध्ये बडोद्यात अस्पृश्यांच्या २८८ शाळा होत्या. या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९,६९५ होती. तर सहशिक्षण देणाऱ्या शाळांमधील विद्यार्थी संख्या ५,८४६ होती. म्हणजेच अस्पृश्य शाळांतील विद्यार्थी संख्या मिश्र शाळेतील विद्यार्थी संख्येपेक्षा जवळजवळ दुप्पट होती.

तर १९४०-४१ मध्ये ही परिस्थिती बरोबर उलटी झाली होती. १९१०-११ मध्ये अस्पृश्यांच्या शाळांची संख्या २८८ होती ती १९४०-४१ मध्ये ६० वर आली. तर अस्पृश्यांच्या शाळेतील विद्यार्थी संख्या १९४०-४१ मध्ये ४,१८९ इतकी खाली आली. तर मिश्र शाळेतील विद्यार्थी संख्या १६,६१८ इतकी झाली. म्हणजेच अस्पृश्यांच्या शाळांपेक्षा मिश्र शाळांतील विद्यार्थी संख्या चार पट वाढली होती. हे वास्तव विचारात घेता अस्पृश्यता निर्मूलनामध्ये सर्वात क्रांतिकारक यश सयाजीरावांनी साध्य करून दाखवले हे स्पष्ट होते. ही भारतातील सर्वात मोठी शैक्षणिक क्रांती होती जिचा आजपर्यंत अभ्यास झालेला नाही.

## वेदोक्त : बडोदा आणि कोल्हापूर

सयाजीरावांसारखी धर्मविषयक भूमिका आणि वैश्विक दृष्टी आधुनिक भारतात फार कमी लोकांकडे होती. ही दृष्टी त्यांनी जग प्रवास आणि धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास, नीतिशास्त्र या विषयांवरील जगातले सर्वोत्तम ग्रंथ वाचून त्यावर भारतीय संदर्भात स्वतंत्र तुलनात्मक चिंतन करून कमावली होती. शाहू महाराजांचे इंग्रजी वाचनसुद्धा चांगले होते हे प्रबोधनकार ठाकरेंच्या आत्मचरित्रातून कळते. दुर्दैवाने राजर्षी शाहूंचे वाचन या विषयावर संशोधन आणि लेखन न झाल्यामुळे त्यासंदर्भातील तपशील मिळत नाहीत.

सयाजीरावांचा स्वभाव आत्मकेंद्री नसला तरी त्यांच्या चिंतनशील स्वभावाला एकांत आवडत असे. शाहू महाराजांचा स्वभाव मात्र मनात येईल ते कोणताही आडपडदा न ठेवता करणे आणि बोलणे असा होता. या दोघांच्या व्यक्तिमत्त्वाचा उलगडा होण्यासाठी वेदोक्ताएवढे उत्तम उदाहरण नाही. आधुनिक काळातील वेदोक्त प्रकरण म्हटले की आपल्याला कोल्हापूर आणि शाहू महाराज आठवतात. परंतु कोल्हापूर अगोदर बडोद्यामध्ये हे प्रकरण उद्भवले.

## बडोद्यातील वेदोक्त

बडोद्यातील वेदोक्त प्रकरणाची सुरुवात १८९१ ला झाली. १८९१ मध्ये सयाजीराव जोधपूरला गेले असता तेथील शिवदत्त जोशी यांनी हे प्रकरण सयाजीरावांच्या लक्षात आणून दिले.

१८९२ मध्ये पुन्हा जोधपूर येथे रजपूतांमध्ये धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने होत असल्याचे पाहिल्यानंतर सयाजीरावांनी या संदर्भात माहिती घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या राजवाड्यातील देवघर प्रमुख राजारामशास्त्री टोपलेंपासून रियासतकार सरदेसाईंपर्यंत विविध धर्म जाणकारांशी चर्चा करून स्वत:ची बौद्धिक तयारी झाल्यानंतरच त्यांनी अंमलबजावणीच्या दृष्टीने पाऊले उचलली. ब्राह्मण शास्त्री वेदोक्तास टाळाटाळ करतात हे पाहून १८९५ ला पहिल्यांदा अप्पासाहेब मोहिते या मराठ्याची खानगी कारभारी म्हणून नियुक्ती केली. वेदोक्ताचा निर्णय घेतल्यानंतर होणारा संघर्ष आणि गोंधळ टाळण्याची ही पूर्वतयारी होती.

त्यानंतर १८९६ च्या दसऱ्यापासून राजवाड्यावरील सर्व विधी वेदोक्त पद्धतीने होतील असा आदेश सयाजीरावांनी त्यांच्या मसुरी स्वारीतून काढला. या निर्णयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्यांनी अप्पासाहेब मोहिते यांच्यावर सोपवली. १८९६ पासून बडोद्यात वेदोक्त विधीचे धोरण प्रसंगी पुरोहित बदलून सयाजीरावांनी रीतसर सुरू केले. १८९८ ला आपल्या युवराजांच्या मुंजीसुद्धा त्यांनी वेदोक्त पद्धतीने केल्या. राजवाड्यातील मंदिराचा खर्च असो किंवा दानधर्माच्या नावाखाली होणारी पैशाची उधळण असेल, हे सर्व सयाजीरावांनी शांतपणे आणि शिस्तबद्धरीत्या नियंत्रणात आणले.

वेदोक्त प्रकरणावेळी बडोद्यात उद्भवलेली परिस्थिती विशद करताना रियासतकार सरदेसाई लिहितात, "इकडे प्रथम

वेदोक्तकर्म करण्याचे शास्त्रीबुवांनी कबूल केल्यावर त्यात सामील होण्याची प्रत्यक्ष पाळी आली; तेव्हा त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर ते बडोद्यानजीक छाणी गावी जाऊन राहिले. अर्थात या राजीनाम्याने गावात मोठी चळवळ उडाली. ते जुन्या पक्षाचे अध्वर्यू असे जाहीर झाले. गावात या प्रश्नाची उघड उघड चर्चा होऊ लागली. सुधारक व प्रतिगामी असे दोन तट गावात उपस्थित झाले. शास्त्री, वैदिक वगैरे मंडळींनी सभा भरवून या प्रश्नाची चर्चा जोराने सुरू केली आणि काही झाले तरी देवघरात पूर्वीचे पुराणोक्तच चालू राहावे, वेदोक्त चालू होऊ नये, महाराजांनी हुकूम केला तरी तो मानू नये, असा शहरांतील बहुतेक मंडळींनी आग्रह धरला. श्रावणमास दक्षिणेसाठी येणाऱ्या बाहेरच्या मंडळींनी बडोद्यास येऊ नये अशीही खटपट करण्यात आली. असा विरोध पाहताच महाराजांसही आपला बोज व हुकुमत राखण्याची आवश्यकता विशेष भासू लागली.

योग्य वाटते ते कोणासही न भीत करावयाचे हे राजाचे पहिले कर्तव्य असत, त्याविषयी केवळ लोकांस खुश करण्याकरिता माघार घेणे शक्य नव्हते. याच सुमारास त्यांनी अप्पासाहेब मोहिते यांस प्रथम मानकरी म्हणून नोकरीत दाखल केले आणि महिना पंधरा दिवसांच्या आत त्यांची नेमणूक नायब खानगी कारभारी अशा हुद्याने खानगीत केली. (तारीख २८-१२-१८९६). हे अप्पासाहेब मोहिते महाराजांचे हेतू अमलात आणण्यासाठी तत्पर होते आणि वेदोक्त प्रकरणात तेच प्रमुख आहेत. ... पुढे

राजारामबुवा पुनः आपल्या नोकरीवर रुजू झाले. त्यांजला हा वेदोक्ताचा प्रश्न सोडविण्यास महाराजांनी सांगितले. त्यांनी पुष्कळ निरनिराळ्या शास्त्री मंडळींशी चर्चा करून महाराजांस असे सुचविले की, "वेदोक्तकर्म करण्यास हरकत नाही; परंतु आज पुष्कळ वर्षांचा प्रचार मोडून नवीन उपक्रम करावयाचा आहे; त्यास वाई, नाशिक, काशी वगैरे ठिकाणांहून मोठ-मोठी विद्वान् शास्त्री, पंडित वगैरे मंडळी एकत्र करून त्यांच्या संमतीने हे काम करावे. अशी मंडळी जमा करून योग्य दक्षिणा वगैरे देऊन त्यांचा संतोष केल्याशिवाय ही गोष्ट सिद्धीस जाणार नाही. असे करण्यास निदान लाख दोन लाख तरी खर्च होईल आणि असा खर्च करून महाराजांनी आपला लौकिक वाढविला म्हणजे वेदोक्त यशस्वी होईल." एक प्रकारे ब्राह्मणांना लाच देण्याचाच हा पर्याय होता. परंतु महाराजांनी थेटपणे नाकारला.

शिवाजी महाराजांनी गागाभट्टाला मुबलक दक्षिणा देऊन आपला पहिला राज्याभिषेक करून घेतला. हा राज्याभिषेक म्हणजे वेदोक्ताच्या संघर्षाचा आरंभबिंदू होता. त्यावेळच्या परिस्थितीमुळे डावपेचाचा भाग म्हणून भरमसाट द्रव्य देऊन हा राज्याभिषेक करावा लागला. यात झालेली द्रव्यहानी भरून काढण्यासाठी सिंहासन कर बसवावा लागला. पुढे साताराचे वेदोक्त घडले. प्रतापसिंह महाराजांनी शिवाजी महाराजांप्रमाणेच राजपूत वंशावळीचा आधार घेत हे प्रकरण हाताळले. यानंतर घडलेल्या बडोद्याच्या वेदोक्तात सयाजीरावांनी मात्र ब्राह्मणांना

लाच देण्याचा पर्याय धुडकारून एकप्रकारे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकात झालेली द्रव्य आणि मानहानीची वसुलीच केली. हा इतिहास शिवरायांच्या मावळ्यांना दहा हत्तीचे बळ देणारा आहे. परंतु प्रचंड इतिहास संशोधन होऊनही इतिहासाबाबतच्या 'अज्ञानाच्या डोंगरात' हा लखलखता इतिहास आपल्याला दिसला नाही.

## सयाजीराव : कोल्हापूरच्या वेदोक्तातील 'पाठीराखे'

बडोद्यातील १८९६ मध्ये उद्भवलेले वेदोक्ताचे प्रकरण १९०० ला कोल्हापूर संस्थानात उद्भवले. राजवाड्यावरील सर्व विधी वेदोक्ताऐवजी पुराणोक्त पद्धतीने होतात हे राजारामशास्त्री भागवतांनी शाहू महाराजांच्या लक्षात आणून दिले. त्यानंतर शाहू महाराज विरुद्ध ब्राह्मण हा संघर्ष तीव्र झाला. टिळकांच्या केसरीने राजर्षी शाहूंच्या विरोधात आणि ब्राह्मणांच्या बाजूने हे प्रकरण तापवले. ७ ऑक्टोबर १९०१ रोजी राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने केले पाहिजेत व जो न करील त्याला दक्षिणा मिळणार नाही असा हुकूम शाहू महाराजांनी काढला. परंतु कोल्हापुरातील ब्राह्मण याला दाद देत नव्हते. पुढे हे प्रकरण १९०५ पर्यंत पेटत राहिले.

या कालखंडाविषयी आणि या दोन्ही प्रकरणांविषयी शाहू चरित्रकार सूर्यवंशी म्हणतात, "बडोद्याचे राजोपाध्ये राजारामशास्त्री यांनी तेथील वेदोक्त प्रकरणात राजीनामा तरी दिला होता, परंतु कोल्हापूरचे राजोपाध्ये राजीनामाही देत

नव्हते आणि आज्ञापालनही करीत नव्हते. गुळाच्या ढेपीला मुंगळा चिकटून राहावा तसे ते 'वतन व वेतन' यांना चिकटून राहिले होते. त्यांना वतन सोडायचे नव्हते आणि विहित कर्मही करावयाचे नव्हते. "स्वमताभिमानासाठी वतन व वेतन यांवर पाणी सोडा" हा विजापूरकारांनी दिलेला मौलिक उपदेश हा जगाला दाखविण्यासाठी आहे, आचरणात आणण्यासाठी नाही, हे राजोपाध्ये ओळखून होते. ते स्वमताला चिकटून होते, तसेच स्वार्थालाही चिकटून होते. राजारामशास्त्र्यांनी बडोद्याच्या सयाजीराव महाराजांचा मार्ग मोकळा केला. अप्पासाहेब राजोपाध्यांनी कोल्हापूरच्या छत्रपतींचा मार्ग बिकट केला."

वरील चर्चेवरून एक बाब स्पष्ट होते की, एकच प्रकरण हाताळत असताना या दोन राजांच्या धोरणातील फरकामुळे या दोन ठिकाणच्या वेदोक्ताचे परिणाम वेगवेगळे झाले. सयाजीरावांनी या प्रकरणाच्या हाताळणीसाठी त्यांच्या स्वभावाप्रमाणे भरपूर वेळ घेऊन योग्य नियोजन केले. त्या तुलनेत बदलासाठी आग्रही असणारे आणि आपल्या आदेशाची तत्काळ अंमलबजावणी झालीच पाहिजे अशी भूमिका असणारे शाहू महाराज यांच्या कार्यपद्धतीतील फरक स्पष्ट होतो. या ठिकाणी एक बाब नमूद करायला हवी की शाहू महाराजांच्या वेदोक्ताच्या संघर्षात सयाजीराव शाहू महाराजांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते.

त्या संदर्भात दि. के. बेडेकरांचे निरीक्षण एकूणच महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्षाचे दिग्दर्शन करते. ते म्हणतात, "१९००

पूर्वीच्या कालखंडात ब्राह्मणवर्गाने जोतीबा फुले यांच्याशी जो तुटकपणा व बेपर्वाईची वृत्ती दाखविली ती चुकीची होती. १९०० नंतरच्या काळात पुन्हा अशीच चूक 'वेदोक्त प्रकरण' या गाजलेल्या प्रकरणात घडली. पत्रव्यवहारामध्ये या बाबतीत एक महत्त्वाचे पत्र आले आहे. ते पत्र सयाजीरावांनी शाहूछत्रपतींना लिहिलेले असून त्यात म्हटले आहे की, 'सातारा येथील माझ्या मनुष्याला पत्र लिहून त्याच्याजवळ कागदपत्र असतील तर ते आपल्या हवाली करण्यास कळवितो.' प्रतापसिंह महाराजांनी 'वेदोक्त विधीची पद्धत' १८३८ साली सुरू करविली व त्यासाठी उदेपूरच्या घराण्याची भोसले घराणे ही शाखा असल्याचा पुरावा उदेपूराहून आणवून घेतला होता. यासंबंधीचे हे कागदपत्र आहेत. खुद्द सयाजीरावांनी १८९६ पासून आपल्या राजवाड्यातील धर्म कृत्ये वेदोक्त पद्धतीनेच सुरू केली होती. शाहूमहाराजांनी वेदोक्त विधीबद्दल जो रास्त आग्रह धरला त्याला काही विलंब न लावता व आढेवेढे न घेता मान्यता देणे पुण्याच्या ब्राह्मण नेत्यांना शक्य होते. पण या बाबतीत योग्य ते धोरण न ठेवण्याची चूक झाली व मराठा समाजाला (म्हणजे त्यातील वरिष्ठ लोकांना) ब्राह्मणांविरुद्ध सकारण राग आला, हे उघड दिसते."

दि. के. बेडेकरांच्या या निरीक्षणाला आधार पुरविणारे संदर्भ शाहू पेपर्सच्या १० खंडांमध्ये आपल्याला सातत्याने भेटतात. १९०१ पासून हा संघर्ष शाहूंच्या मृत्यूपर्यंत म्हणजेच १९२२ पर्यंत जवळजवळ २१ वर्षे शाहूंच्या मनात खदखदत होता. या संदर्भात अनेक पत्रांमध्ये ते वेदोक्ताच्या निमित्ताने धर्मचर्चा करताना

दिसतात. त्यांच्या आक्रमक स्वभावाला अनुसरून वेगाने आणि कायमचा ब्राह्मणी वर्चस्वाचा हा बुरूज फोडण्यासाठी ते पेटून उठले होते. त्यामुळेच धर्म आणि जातविषयक सुधारणा करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना ते वेदोक्तानंतर झपाट्याने जवळ करू लागले. म्हणूनच पुढे मग तो सत्यशोधक समाज असो, आर्य समाज असो किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ब्राह्मण्यांविरुद्धची लढाई असो, शाहू महाराजांचा धर्म आणि सामाजिक सुधारणांना हक्काचा राजाश्रय होता. राजारामशास्त्री भागवत आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्याशी त्यांचे असणारे जिव्हाळ्याचे नाते या लढाईचाच एक भाग होता.

या सर्व संघर्षात सयाजीराव गायकवाड, खासेराव जाधव, पंडित आत्माराम आणि एकूणच बडोदा संस्थानाशी मार्गदर्शन, तज्ज्ञ, नैतिक पाठबळ किंवा अनुकरणीय उपक्रम याबाबत त्यांचा जवळचा संबंध होता. या संदर्भात शाहू चरित्रकार रमेश जाधव म्हणतात, "शाहू छत्रपतींनी वरील सर्वच धार्मिक चळवळींना कमी-जास्त प्रमाणात पाठिंबा दिला होता. परंतु या सर्वच समाजांकडून त्यांना हवी असणारी नवसमाजरचना निर्माण होणे थोडे अवघड वाटत होते. म्हणून या सर्व समाजाच्या संदर्भातील आपली नापसंती त्यांनी आपले बडोद्याचे ज्येष्ठ मित्र- की ज्यांना शाहू छत्रपती गुरुस्थानी मानीत होते, त्या खासेराव जाधवांना शुक्रवार दिनांक २२ ऑक्टोबर १९२० रोजी लिहिलेल्या सविस्तर पत्रात पाहावयास सापडते.

त्या पत्रात आर्य समाजासंबंधी ते सांगतात, “मूर्तिपूजा आमच्यात चालू आहेच. म्हणून आर्यसमाज मला माहीत नाही.” यापुढे आपला स्वभाव कसा स्वाभिमानी आहे हे सांगताना ते आपल्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना नमूद करतात. ते लिहितात, “जरी खुद्द परमेश्वराला मी नको असलो तर मी त्याच्याकडे जाणार नाही. अर्थातच ज्यांना मी नको त्यांच्याकडे जाणार नाही. उदाहरणार्थ बरेच दिवस मी प्रयागातील संगम पोहून त्या देवाच्या दर्शनास जात असे. एके दिवशी उन्हाळ्यात मी पोहत असताना माझे पाय धोतरात अडकले. त्याच रात्री मला दृष्टांत झाला की, माझ्या दर्शनास येऊ नको. त्या दिवसापासून मी त्या देवाच्या दर्शनास जात नाही.”

## खासेराव जाधव : सयाजीराव - शाहूंमधील ‘क्रांतिकारक’ दुवा

राजर्षी शाहू आणि खासेराव यांच्यातील नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. कित्येक प्रसंगी शाहू महाराज खासेरावांना खाजगी पत्रे लिहून महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करत असत. १९१६-१७ मध्ये  सयाजीरावांची नात इंदुमती आणि शाहू महाराजांचे पुत्र राजाराम यांच्या विवाहाची बोलणी सुरू झाली. परंतु ती फारच ताणली गेली होती. त्यावेळी हा विवाह ठरणारच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे खासेराव खूपच अस्वस्थ झाले होते. शाहू आणि सयाजीराव या दोघांचीही मने वळवण्यासाठी त्यांनी खूप धावपळ केली. यामागे या दोन

राजांमधील जुन्या नातेसंबंधांना या लग्नाने नवा उजाळा मिळावा ही खासेरावांची तळमळ होती.

खासेरावांचे सयाजीराव आणि शाहू या दोघांच्यावर अतूट प्रेम होते. राजर्षी शाहू खासेरावांना गुरुस्थानी मानत होते. त्यामुळे खासेराव हा या दोघांना जोडणारा दुवा होता. हा दुवा महाराष्ट्राच्या उत्कर्षाला लाभदायक ठरला असे इतिहास सांगतो. शाहू महाराज ज्या खासेराव जाधवांना गुरुस्थानी मानत होते ते खासेराव जाधव सयाजीरावांचे नातेवाईक आणि विश्वासू अधिकारी होते. राजर्षी शाहू बऱ्याचदा आपले मन मोकळे करण्यासाठी खासेरावांना पत्र लिहीत असत. त्याचप्रमाणे सयाजीरावही आपले मन मोकळे करण्यासाठी खासेरावांशी बोलत असत. बऱ्याचदा शाहू महाराज काही बाबींची चर्चा थेट सयाजीरावांशी न करता खासेरावांशी करत असत. एक प्रकारे सयाजीराव आणि शाहू महाराजांना जोडणारा एक विश्वासू आणि क्रांतिकारक दुवा अशीच खासेरावांची भूमिका होती.

१९०१ मध्ये सयाजीरावांनी शाहूंना लिहिलेल्या एका पत्रात वेदोक्त प्रकरणातील सहकार्यासंदर्भात चर्चा झाली आहे त्याचप्रमाणे याच पत्रात सयाजीराव शाहूंना वडीलकीच्या नात्याने मार्गदर्शन करतानाही दिसतात. या पत्रात सयाजीराव म्हणतात, “आपण विलायतेस जाल तेव्हा युरोप खंडातील चित्तवेधक स्थळे व संस्था पाहण्याची संधी केव्हाही दवडू नये. अशा संस्थांचे निरीक्षण केल्याखेरीज पाश्चात्य देशांत त्या

निरनिराळ्या संस्कृती उपलब्ध आहेत, त्यांचे तुलनात्मक ज्ञान संपादिता येणार नाही. आपण ज्या कार्याला उदार अंत:करणाने चालन दिले आहे, ते मी विसरलो नाही व पुढेही विसरणार नाही. आम्हाला थोडीशी अनुकूल परिस्थिती प्राप्त होण्याची मी वाट पाहत आहे. आपण आमच्या लोकांच्या कल्याणाचे कामी जे लक्ष घालीत आहात, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.”

१८८७ च्या पहिल्या युरोपवारीत सयाजीरावांनी तुलनात्मक विचाराचे महत्त्व स्वअनुभवातून जाणले. पुढे आयुष्यभर त्यांनी हा वसा जपला. तुलनात्मक विचारपद्धतीमुळे आपल्या विचाराला संतुलन लाभते. त्याचप्रमाणे आंधळ्या अनुकरणापेक्षा आपल्या परिस्थितीनुसार इतरांकडून काय आणि कसे स्वीकारावे याची दृष्टी लाभते. याच भूमिकेतुन सयाजीरावांनी शाहूंना वरील ‘वडीलकी’चा सल्ला दिला होता.

## बडोदा : कोल्हापुरातील सामाजिक सुधारणांचा ‘रोडमॅप’

सामाजिक सुधारणेबाबत शाहूंच्या पुढे बडोद्याचा आदर्श कसा होता याचा आणखी एक उत्तम पुरावा म्हणजे ९ मे १९१८ रोजी शाहू महाराजांनी सयाजीरावांना लिहिलेले इंग्रजी पत्र. या पत्रात बडोद्यातील शिक्षण निरीक्षक म्हणून काम करणारे आर्य समाजाचे कार्यकर्ते पंडित आत्माराम हे बडोद्याच्या सेवेतून कोल्हापुरात शैक्षणिक काम पाहण्यासाठी हवे असल्याचे शाहू महाराजांनी सयाजीरावांना लिहिले होते. त्याचप्रमाणे याच पत्रात बडोद्यातील जमीन विभाजनासंदर्भातील कायदा हवा असल्याचे लिहिले होते.

या पत्राला उत्तर देताना १२ मे १९१८ रोजी शाहू महाराजांना लिहिलेल्या पत्रात सयाजीराव म्हणतात, “पंडित आत्माराम यांच्या संदर्भातील आपल्या दि. ९ मे रोजीच्या पत्राबाबत धन्यवाद. आत्माराम हे शिक्षण खात्यातील एका महत्त्वाच्या विभागाचे प्रमुख असल्यामुळे त्यांना तुमच्याकडे पाठवता येत नाही. तुमची खूपच इच्छा असेल, तर त्यांना काही दिवस तुमच्या इच्छा काय आहेत हे जाणून घेण्यासाठी तुमच्याकडे पाठविण्यास मी माझ्या मंत्र्यांना सांगितले आहे. तुम्ही तुम्हाला मदत करण्यासाठी एखाद्या आर्य समाजी व्यक्तीला पंजाब किंवा मुंबईवरून आमंत्रित करायला हवे. तुम्ही पं.आत्माराम यांना काही नावे सुचवण्यास सांगू शकता. तुमचे दि.९ मे रोजीचे मराठीतील पत्रही मला मिळाले. जमिनीच्या विभाजनाबद्दचा कायदा अद्याप पास झालेला नाही, तो पास झाल्यानंतर त्यासंदर्भात तुम्हाला माहिती पाठवण्यास मी माझ्या मंत्रिमहोदयांना सांगितले आहे.” या पत्रातील मजकुरावरून कोल्हापुरातील सामाजिक सुधारणांमधील बडोद्याचा ‘मार्गदर्शक’ संदर्भ पुढे येतो.

आधुनिक महाराष्ट्राच्या मराठा जातीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी सर्वप्रथम आणि सर्वाधिक योगदान देणारे गंगारामभाऊ म्हस्के यांनी १८८५ मध्ये पुण्यात मराठा जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी ‘डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन’ या संस्थेची स्थापना केली. मराठा जातीतील पहिली उच्च शिक्षण घेतलेली पिढी म्हस्केंमुळे तयार झाली.

महाराजांनी या संस्थेला १८८५ ते १८८९ पर्यंत असे ५४ वर्षे अखंडपणे आर्थिक पाठबळ दिले. ही मदत ५ लाख २९ हजार ५५६ रु. इतकी होती. आजच्या रकमेच्या दरात या रकमेचे कमीतकमी मूल्य ७२ कोटी २५ लाखांहून अधिक भरते. राजर्षी शाहू महाराजांचा म्हस्केंशी पत्रव्यवहार होता. वसतिगृह, शिक्षण आणि संस्थानी प्रशासनासाठी शिकलेले लोक मिळवण्यासाठी हा पत्रव्यवहार होत होता.

१८९४-९५ च्या दरम्यान शाहू महाराजांनी म्हस्केंना बहुजन समाजातील पदवीधर विद्यार्थ्यांची नावे मागितली होती. त्यांनी दाजीराव अमृतराव विचारे आणि भास्करराव विठ्ठलराव जाधव या दोन होतकरू तरुणांची नावे शाहू छत्रपतींना कळविली. पुढे शाहू महाराजांनी भास्करराव जाधवांची ८ जून १८९५ रोजी असिस्टंट सरसुभे म्हणून कोल्हापूर संस्थानात नेमणूक केली. पुढे २७ वर्षे भास्करराव जाधवांनी कोल्हापूर संस्थानात महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. शाहू महाराजांनी दाजीराव विचारे यांनाही बांधकाम विभागाचे प्रमुख केले. या उदाहरणावरून १८८५ पासून सयाजीरावांनी या संस्थेला दिलेला राजाश्रय महाराष्ट्राला किती उपकारक ठरला हे सूचित होते. तर सयाजीरावांचे आर्थिक पाठबळ मिळालेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या शिष्यवृत्तीवर शिकलेल्या ३२ व्यक्ती कोल्हापुरात महत्त्वाच्या पदांवर होत्या. यामध्ये जिवाजीराव सावंत, पहिले क्षात्रजगत्गुरू सदाशिवराव पाटील बेनाडीकर, कोल्हापूर संस्थानातील पहिले

मराठा न्यायाधीश खंडेराव बागल, शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या पहिल्या वसतिगृहाचे पहिले विद्यार्थी पी. सी. पाटील ही काही प्रमुख उदाहरणे सांगता येतील. यावरून असे दिसते की शाहू महाराजांच्या कार्याला बडोदा आणि सयाजीरावांकडून मिळालेली प्रेरणा, नैतिक पाठबळ आणि सहकार्य हे वादळातील दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारे ठरले आहे.

विविध सामाजिक सुधारणांसाठी सयाजीराव आणि बडोदा हा शाहू महाराजांचा कसा हक्काचा आधार होता हे शाहू महाराजांनी कर्नल वूडहाऊसला १९१८ व १९१९ मध्ये लिहिलेल्या पत्रातून पुन्हा एकदा प्रतीत होते. या पत्रात शाहू महाराज म्हणतात, “... की पंडित आत्माराम या आर्य समाजाच्या सभासदाकडे आपण सत्यशोधक समाजाच्या लोकांना वेद शिकविण्यासाठी एखादी जाणकार व्यक्ती पाठवा अशी विचारणा केली आहे.” महाराजांनी आर्य समाज आणि पंडित आत्माराम यांच्या माध्यमातून बडोद्यातील अस्पृश्य शिक्षणाबाबत मूलभूत आणि पथदर्शक काम केले होते. शाहू महाराजांसाठी तो ‘अनुकरणीय’ आदर्श होता. हेच वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

आर्य समाज, सयाजीराव आणि शाहू यांच्यातील सहसंबंध डॉ. रा.चिं. ढेरे यांनी अतिशय दुर्मिळ संदर्भांच्या आधारे मांडला आहे. तोसुद्धा सयाजीराव आणि शाहू यांच्यातील मार्गदर्शक आणि अनुयायी या नात्यावर स्वच्छ प्रकाश टाकणारा आहे. डॉ. ढेरे लिहितात, “महाराजांचे धाकटे बंधू संपतराव गायकवाड यांनी स्वामीजींना कळवले होते की, आर्य समाजाच्या विचारांच्या

प्रसारासाठीच नव्हे तर समाजसेवेच्यासाठी विशेषतः अंतजांच्या शिक्षणासाठी उपयोग व्हावा म्हणून महाराजांनी बडोदा शहराच्या परिसरातच एक वास्तू देण्याची इच्छा दर्शवली आहे.

असे हे आर्य समाजाच्या प्रचारकांनी प्रभावित केलेले बडोदा शहर आणि तेथील सयाजीरावांसारखे निर्भय, निरामय, प्रागतिक शासक राजर्षी शाहूंच्या प्रेमाचे विषय होते. राजर्षींच्या पत्नी महाराणी लक्ष्मीबाई बडोद्यातीलच. गुणाजीराव खानविलकर या जहागीरदारांच्या कन्या होत्या आणि हे घराणे गायकवाड घराण्याशी निकटच्या नातेसंबंधातील होते. महाराणी लक्ष्मीबाईंच्या आजींचे सयाजीरावांशी बंधुत्वाचे नाते होते. राजर्षींवर बडोद्याचा अवीट प्रभाव होता.” ढेरेंनी आर्य समाजाच्या अंगाने राजर्षी शाहूंवरील ‘सयाजी प्रभाव’ वरीलप्रमाणे स्पष्ट केला आहे. शाहूंच्या सर्वच पुरोगामी धोरणांवर ‘सयाजी प्रभाव’ नाकारता न येण्याइतका स्पष्ट आहे. परंतु शाहूंवरील अलीकडच्या एका सर्वात परिपूर्ण आणि संशोधनात्मक ‘महाप्रकल्पा’त मात्र सयाजीरावांचा संबंध केवळ ‘अर्पणपत्रिके’त ‘बांधून’ ठेवला आहे हे विशेष. यावर स्वतंत्र संशोधन होण्याची नितांत गरज आहे.

## महाराजा सयाजीराव : राजर्षी शाहूंचे ‘फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड’

महाराजा सयाजीराव राजर्षी शाहूंसाठी फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड होते यावर प्रकाश टाकणारे लॉर्ड कर्झनचे एक पत्र शाहू पेपर्समध्ये उपलब्ध आहे. या पत्रात कर्झनने भारतीय

राज्यकर्त्यांचा आदर्श सयाजीराव कसे आहेत यावर भाष्य केले आहे. हे पत्र सयाजीरावांचे भारतातील प्रागतिक प्रशासक म्हणून असणारे स्थान स्पष्ट करते. कर्झन भारतातला आपला कार्यकाळ पूर्ण करून परत जात असताना निरोप समारंभात लॉर्ड कर्झनची शाहू महाराजांशी भेट झाली. यावेळी कर्झनने सयाजीरावांबद्दल जे गौरवोद्गार काढले होते त्याबद्दल सयाजीरावांचे अभिनंदन करणारे पत्र शाहू महाराजांनी सयाजीरावांना २२ एप्रिल १९०८ रोजी लिहिले होते. त्या पत्रात सयाजीरावांबद्दल कर्झन काय म्हणाले हे सांगताना शाहू महाराज लिहितात, 'His ideas of comparing Your Highness to a steam engine is original and quite true. I quite agree with every one of what he says. I only hope that there may be some more Chiefs to follow in Your Highness' footsteps.'

येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी लागते ती अशी की ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये सयाजीरावांचा सर्वाधिक संघर्ष लॉर्ड कर्झनशी झाला होता. असे असूनही कर्झन सयाजीरावांबद्दल जे बोलतो ते अधिक महत्त्वाचे आहे. सयाजीरावांच्या प्रागतिक धोरणाचे अनुकरण इतर संस्थानिकांनी करावे असे जेव्हा कर्झन शाहू महाराजांना सांगतो तेव्हा शाहू महाराजांनी तो आदर्श अवलंबावा हेच कर्झन सूचित करतो. २२ सप्टेंबर १९१७ ला राजर्षी शाहूंनी सयाजीरावांना लिहिलेल्या पत्रात आपले जीवनध्येय पुढील शब्दात व्यक्त केले आहे. "I want to get it

(i.e. programme of introducing Free and Compulsory Primary Education in the State) done in my life time and follow Your Highness.” यावरून शाहू महाराजांनी सयाजीरावांना आपले आदर्श म्हणून स्वीकारले होते हे सिद्ध करते.

## धार्मिक सुधारणा : बडोदा-कोल्हापूर ‘सहसंबंध’

बडोद्यातील धर्म सुधारणांमध्ये वेदोक्त प्रकरण हा एक महत्त्वाचा टप्पा होता. कारण १८९६ च्या बडोद्यातील वेदोक्ताच्या अगोदर १४ वर्षे म्हणजेच १८८२ मध्येच सयाजीरावांनी धर्म सुधारणांचे काम हाती घेतले होते. दरम्यान सयाजीरावांनी धर्मसुधारणा सुरू केल्या होत्या. सयाजीरावांनी ब्राह्मण आणि मुसलमान यांना धर्मकार्य म्हणून वाटली जाणारी खिचडीसाठीची तांदूळ आणि डाळ यातील सावळा गोंधळ दानधर्माचा नियम करून संपवला होता. अन्नदान करायचेच असेल तर ते गरजू, अंध, अपंग, अनाथ यांना करण्यासाठी पास देण्याची व्यवस्था करून सरकारी खजिन्याची लूट थांबवली होती. हीच परंपरा राजर्षी शाहूंनी पुढे ३८ वर्षांनी स्वीकारल्याचा पुरावा २२ ऑक्टोबर १९२० मध्ये शाहू महाराजांनी बडोद्याच्या खासेराव जाधवांना लिहिलेल्या पत्रात आढळतो.

या पत्रात “आपण कोल्हापूर संस्थानामार्फत पंढरपूरच्या देवस्थानासाठी नैवेद्य इत्यादींवर होणारा खर्च बंद करून त्याचा वापर गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करावा असा हुकूम

दिल्याचे" मोठ्या समाधानाने शाहू महाराज सांगतात. शिक्षण आणि धर्मसुधारणा ही समाज प्रगतीच्या रथाची दोन चाके आहेत हे फुल्यांपासून सर्वच समाजसुधारकांच्या सामाजिक विचारांचे सार आहे हे आपण जाणतोच. ज्याप्रमाणे कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक प्रगतीसाठी पंडित आत्माराम यांची मदत शाहू महाराज घेत होते त्याचप्रमाणे धर्मसुधारणेतही आत्माराम हे शाहूंच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. कारण सयाजीरावांनी बडोद्यातील अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या कामात आणि धर्मसाक्षरतेच्या उपक्रमात पंडित आत्माराम यांच्याकडून करून घेतलेले उत्तम काम शाहूंच्या समोर होते.

शाहू महाराजांनी आपल्या जनक घराण्यातील चुलत बहिणीचा विवाह इंदूरच्या होळकर या संस्थानात घडवून आणण्यासाठी १९१८ पासून खूप प्रयत्न केले होते. राजर्षी शाहूंच्या हयातीत हा विवाह ठरला आणि त्यांच्या मृत्यूनंतर तो विवाह झाला. या विवाहाची प्रेरणासुद्धा बडोदाच होती. सयाजीराव महाराजांच्या कन्या इंदिराराजे यांनी कूचबिहार या आदिवासी संस्थानातील राजकुमार जितेंद्र नारायण यांच्याशी स्वत: ठरविला होता. हा विवाह १९१३ ला झाला. हा फक्त आंतरजातीय विवाह नव्हता तर मराठा-आदिवासी विवाह होता हे महाराष्ट्राला माहीत नाही. आधुनिक भारतातील जातीअंताच्या चळवळीला सर्वाधिक प्रेरणा देणारा हा पहिला अशा प्रकारचा विवाह ठरतो.

जातिव्यवस्था मोडण्यासाठी आंतरजातीय विवाहाचे महत्त्व वेदोक्तानंतर १८ वर्षांत शाहू महाराजांना पटले होते. त्यामुळेच या विवाहातून प्रेरणा घेऊन शाहूंनी आपल्या घराण्यात आंतरजातीय विवाह घडवून आणला असे म्हणता येईल. याबरोबरच शाहू महाराजांनी २३ फेब्रुवारी १९१८ मध्ये आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदाही केला होता. या कायद्याअगोदर १७ वर्षे अशाच प्रकारचा कायदा १९०१ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा या नावाने सयाजीरावांनी बडोद्यात केला होता.

शाहूंनी आंतरजातीय विवाहाचा कायदा करण्याअगोदर २० दिवस म्हणजे ३ फेब्रुवारी १९१८ ला बडोद्याच्या खासेरावांना शाहू महाराजांनी पुढील पत्र लिहिले होते. या दीर्घ पत्रात शाहू महाराज म्हणतात, "...खामगावच्या भाषणात जातिभेद मोडले पाहिजेत असे मी बोलून गेलो, "बोले तैसे चाले, त्याची वंदावी पाऊले" अशी तुकारामाची आहे. त्या दिशेने काही करावे अशा विचाराने आर्य समाजाची उक्ती म्हणजे वस्तुत: वैदिक धर्माची शाखा स्थापन केली. ... निरनिराळ्या जातींचा बेटीव्यवहार तुरळक आहे. ... मराठ्यांत मात्र जरा जास्त आहे. ... म्हणून आपल्या धर्माचा वैदिकपणा कायम ठेवून जातींचा अडथळा कमी करण्याला आर्य समाज सध्याच्या काळी चांगले साधन आहे असे वाटते. ... हल्लीच्या काळीसुद्धा क्षत्रिय मराठ्यांचे संबंध शूद्रांशी झालेले आहेत. कूचबिहारशी तर आमचा संबंध

झालाच आहे. ... सबब या निरनिराळ्या भेदातील हिंदू राजांनी आर्य समाजाच्या विधीप्रमाणे परस्परांत शरीर संबंध केले तर त्यांचे हिंदुत्व तर कायम राहिलच, इतकेच नव्हे तर खऱ्या वैदिक धर्माचे संरक्षण व संवर्धन त्यांच्याकडून झाले असे होईल. ... हल्लीचे लग्नसुद्धा वैदिक पद्धतीप्रमाणे होण्यास मला काहीच हरकत दिसत नाही. तरी या संबंधाने आपले विचार काय आहेत हे मला कळवावे. आपल्या महाराजांचे व कूचबिहारसारख्या राजांचे विचार माझ्याप्रमाणेच पडतील अशी मला फार आशा वाटते.” खासेरावांना लिहिलेले हे खाजगी पत्र शाहूंच्या मृत्यूच्या ४ वर्षे अगोदरचे आहे.

जीवनाच्या उत्तर काळात शाहू महाराज अस्पृश्यता निवारणाबरोबर जातीअंताकडे वळले होते हे यातून स्पष्ट होते. कारण बडोद्याच्या पंडित आत्मारामांना शाहू महाराजांनी कोल्हापूरला बोलावून १९१९ मध्ये राजाराम कॉलेज आर्य समाजाकडे चालवण्यास दिले होते. आत्मारामांच्या नेतृत्वाखाली बडोद्यात अस्पृश्यांच्या शिक्षणाचे कार्य उत्तमरीत्या चालू असल्याचे शाहूंना माहीत होते. त्यामुळे कोल्हापुरातील शिक्षण आणि अस्पृश्योद्धार या दोन्ही कामांसाठीचा हुकमी आधार याच भूमिकेतून शाहू महाराजा बडोद्याकडे पाहात होते. अस्पृश्यांच्या उद्धाराच्या शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श बडोदा होता हे सूर्यवंशींच्या पुढील विधानाच्या आधारेही स्पष्ट करता येईल. “मागासवर्गीयांच्या शैक्षणिक व इतर उन्नतीच्या

संदर्भात आर्यसमाज विशेष प्रयत्नशील असल्याचे महाराजांना आढळून आले.” या संदर्भात बडोद्याकडून त्यांना प्रेरणा आणि नैतिक पाठबळ मिळत होते हे यानिमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट होते.

## सयाजीराव – शाहू : ‘दुर्लक्षित’ पत्रव्यवहार

महाराजा सयाजीराव आणि शाहू महाराज यांच्यात झालेला पत्रव्यवहार पुरोगामी महाराष्ट्राच्या संघर्षगाथेतील एक ऊर्जादायी ‘प्रेरणाप्रवास’ आहे. या पत्रव्यवहारात शाहूंनी ब्राह्मणी व्यवस्थेशी केलेल्या संघर्षात बडोद्याने दिलेले ‘बळ’ अधोरेखित होते. हे बळ शाहूंच्या एकाकी झुंजीत ‘देवदूता’चे काम करणारे ठरले. कोल्हापुरातील आणि पुण्यातील ब्राह्मण समुदायाशी वेदोक्तापासून चालू असलेला शाहूंचा संघर्ष त्यांच्या मृत्यूपर्यंत अखंड सुरू होता. याचा परिणाम म्हणून कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजला मुंबई विद्यापीठाची कायमस्वरूपी मान्यता मिळत नव्हती. त्यामुळे राजर्षी शाहू अस्वस्थ होते. मृत्यूपूर्वी २ महिने म्हणजे २३ मार्च १९२२ ला त्यांनी ‘सयाजीरावांनी लक्ष घालून राजाराम कॉलेजला कायमस्वरूपी मान्यता मिळवून देण्याच्या कामात सहकार्य करावे. या कामी सयाजीरावांनी आपला प्रभाव वापरल्यास त्यांचा मी कृतज्ञ राहीन’ या आशयाचे पत्र सयाजीरावांना लिहिले होते. यानंतर लगेचच राजाराम कॉलेजला कायमस्वरूपी मान्यता मिळाली हे विसरता येणार नाही. याअगोदर राजाराम कॉलेज चालवायला घ्यावे अशी विनंती शाहू महाराजांनी बडोद्याच्या खासेरावांनाही केली होती.

शाहू महाराजांनी २८ जानेवारी १९१९ ला एक आदेश काढून अस्पृश्य विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, पाट्या, पेन्सिली इ. अभ्यास साहित्य पुरवण्याचा हुकूम करून त्यासाठी २५०० रु. मंजूर केले होते. हा आदेश म्हणजे १८८२ च्या सयाजीरावांच्या आदेशाचे शब्दशः अनुकरण होते. कारण सयाजीरावांनी ही योजना १८८२ पासून म्हणजेच शाहूंच्या निर्णयाअगोदर ३७ वर्षे बडोदा संस्थानात राबवली होती.

शाहू-बडोदा पत्र व्यवहारात आणखी एक अत्यंत महत्त्वाचे पत्र उपलब्ध आहे जे राजर्षी शाहूंच्या सामाजिक सुधारणेत शाहू महाराज बडोद्याच्या धोरणांचा सातत्याने अभ्यास करत होते आणि त्या धर्तीवर आपल्या संस्थानात योजना राबवत होते याचा पुरावा ठरते. ३० जानेवारी १९१८ ला शाहू महाराजांनी बडोद्याच्या दिवाणांकडून सयाजीरावांनी लागू केलेल्या विवाह आणि जातीबाबत कायद्यांच्या पुस्तकांच्या काही प्रती मागवल्या होत्या. या संदर्भातील पत्रात शाहू महाराज म्हणतात, "I learn H.H. the Maharaja Saheb has made laws for Baroda Rajya to correct certain social abuses in matters of marriage, degrading caste customs & c. and that in the Penal Code also some changes have been made. I should very much like to see these laws and shall feel obliged if you can very kindly let me have copies containing them." हे पत्र सयाजीरावांच्या कायद्यांची

उपयुक्तता आणि ऐतिहासिकता अधोरेखित करते. बाबासाहेब सयाजीरावांवरील मृत्युलेखात म्हणाले होते की, बडोद्याचे कायदे हे इंग्लंड-अमेरिकेपेक्षाही पुढारलेले आहेत. राजर्षी शाहूंचे वरील पत्र आणि बाबासाहेबांचा अभिप्राय यांचे एकत्र वाचन केल्यास कोल्हापूर या प्रागतिक संस्थानाच्या सामाजिक धोरणांवरील बडोद्याचा प्रभाव स्पष्ट होतो.

मामा परमानंदांनी १८८९ मध्ये सयाजीरावांना उद्देशून लिहिलेली खुली पत्रे म्हणजे सुधारणांचा 'रोडमॅप' होता. त्यामुळेच घाटे म्हणतात त्याप्रमाणे कोल्हापुरातील सुधारणा म्हणजे बडोद्यातील सुधारणांची काही अंशी महाराष्ट्रीय आवृत्ती होती असे म्हणता येईल. मामा परमानंदांनी सयाजीरावांना लिहिलेली ही पत्रे पुढे ग्रंथरूपाने प्रकाशित झाली. शाहू महाराजांचे गुरू फ्रेजर यांनी हा ग्रंथ शाहू महाराजांच्याकडून वाचून घेतला होता. या संदर्भात रमेश जाधव म्हणतात, "... आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महात्मा फुले यांचे एक मित्र-चाहते आणि त्या काळी राजकीय ऋषी म्हणून ज्यांचा गौरव होत होता त्या मामा परमानंद यांचा 'लेटर्स टू ॲन इंडियन राजा' हा ग्रंथ १८९१ मध्ये प्रसिद्ध झाला होता. तो ग्रंथ त्यांनी बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांना उद्देशून पत्ररूपाने लिहिला होता. या ग्रंथाचे गुरुवर्य फ्रेजर यांनी आपल्या शिष्योत्तमाकडून म्हणजेच शाहूराजेंकडून काळजीपूर्वक वाचन करून घेतले. याच ग्रंथातील एका पत्रात शिवछत्रपती हे कसे प्रजाहितदक्ष राजे होते, त्यांचा

आदर्श सर्व भारतीय राजांनी ठेवणे कसे आवश्यक आहे हे स्पष्ट केले होते, तर दुसऱ्या एका पत्रात सम्राट अकबराची न्यायप्रियता कथन केली होती.” हे उदाहरण शाहू महाराजांच्या वैचारिक जडणघडणीवर आणि त्याच्या बडोदा संदर्भावर प्रकाश टाकणारे आहे.

महाराष्ट्र फुल्यांनंतर ‘घाईघाई’ने थेट शाहूंकडे येत असताना किती मोठा ‘बौद्धिक अपघात’ करत आला हेच वरील अनेक उदाहरणांवरून स्पष्ट होते. मामा परमानंद हे फुल्यांचे मित्र आणि हितचिंतक होते. फुल्यांनी त्यांच्या समग्र लेखनात व्यक्त केलेल्या समाजपरिवर्तनाच्या अपेक्षा फुल्यांच्या कल्पनेपेक्षाही अधिक प्रमाणात सयाजीरावांनी सिद्ध केल्या. याच धर्तीवर मामा परमानंदांनी सयाजीरावांच्या राज्याधिकार प्राप्तीच्या पार्श्वभूमीवर व्यक्त केलेल्या अपेक्षाही सयाजीरावांनी मामा पर्मानंदांच्या कल्पनेपलीकडे जाऊन पूर्ण केल्या होत्या हे सयाजीरावांच्या संपूर्ण कारकीर्दीआधारे म्हणता येईल.

फुल्यांचा वारसा सयाजीरावांच्या मार्गे शाहूंकडे कसा आला होता यावर यातून प्रकाश पडतो. इतकेच नव्हे तर स्वतंत्र भारताची लोकशाही राज्यघटनेतील अनेक कलमेही बडोद्यातील कायद्यांशी सुसंगत आहेत. त्यामुळे स्वतंत्र भारतातील सामाजिक लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ म्हणूनसुद्धा सयाजीरावांचा विचार करणे अपरिहार्य ठरते. त्यामुळेच आपण जेव्हा फुले-शाहू-आंबेडकर म्हणतो तेव्हा राजर्षी शाहू आणि डॉ.आंबेडकरांना

फुल्यांशी जोडणारा सयाजीराव हा दुवा अलक्षित राहतो. यातून 'इतिहास कसा घडला' हे समजून घेण्यावर मर्यादा येते.

## बडोदा आणि कोल्हापूर : 'अनोखे' ऋणानुबंध

शाहू महाराजांचे पणजोबा शिवाजी तिसरे ऊर्फ बाबासाहेब महाराज यांच्या पत्नी अहिल्याबाई या बडोद्याचे महाराज गणपतराव गायकवाड यांच्या कन्या होत्या. गणपतराव गायकवाड हे सयाजीरावांचे दत्तक चुलते होते. तर १८९१ मध्ये बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानविलकर यांच्या कन्या लक्ष्मीबाईंशी शाहू महाराजांचा विवाह झाला. सयाजीराव महाराजांची नात इंदुमतीदेवी आणि शाहू महाराजांचे पुत्र राजाराम महाराज यांचा १ एप्रिल १९१८ रोजी झालेला विवाह हा या संस्थानांमधील तिसरा नातेसंबंध होता. तर पुढे ४ जानेवारी १९२९ रोजी कोल्हापूर संस्थानातील हसुरचे सरदार मानसिंगराव सुब्बाराव हसुरकर यांची कन्या शांतादेवी यांचा विवाह सयाजीराव महाराजांचे नातू प्रतापसिंह महाराजांशी झाला.

## इंदुमतीदेवी आणि राजाराम महाराज विवाह

कोल्हापूर आणि बडोदा राजघराण्यातील जुना नातेसंबंध पुढेही चालू राहावा अशी सयाजीराव महाराजांची इच्छा होती. सयाजीरावांचे पुत्र फत्तेसिंहाशी नऊ वर्षांनी मोठे असणाऱ्या राजर्षी शाहूंची घनिष्ठ मैत्री होती. फत्तेसिंहांची कन्या इंदुमती यांच्या विवाहाचा विचार सुरू झाल्यानंतर सयाजीरावांनी २२ जानेवारी १९१० रोजीच्या पत्राद्वारे शाहू महाराजांचे पुत्र राजाराम यांच्याशी

त्यांचा विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. एक वर्षानंतर ४ मार्च १९११ रोजीच्या पत्रासोबत सयाजीरावांनी इंदुमतीदेवींची पत्रिका आणि छायाचित्र शाहू महाराजांकडे पाठवले. शाहू महाराजांनी इंदुमती देवींना पाहण्यासाठी बडोद्याला जाण्याचे निश्चित केल्यानंतर सयाजीरावांनी त्यांना स्वतःसोबत पुत्र राजारामांचा आरोग्यअहवाल आणण्याची सूचना २४ मार्च १९११ रोजीच्या पत्राद्वारे केली. आजही विवाह जुळवताना आपण वधू-वरांची जन्मपत्रिका आणि गुण जुळवण्यासाठी जीवाचा आटापिटा करत असतो.

या पार्श्वभूमीवर ११० वर्षापूर्वी वधू-वरांची आरोग्यपत्रिका तपासणे आवश्यक मानणाऱ्या सयाजीरावांची वैज्ञानिक दृष्टी आपल्याला थक्क करते. सयाजीरावांच्या या पत्राला उत्तर देताना शाहू महाराज लिहितात, "माझी पत्नी महाराणीसाहेब आणि आजीबाईसाहेब या जुन्या रूढी आणि परंपरांचा आदर करणाऱ्या आहेत. वर्षानुवर्षे ज्या-ज्या पद्धतींचा आपण सन्मान करत आलोय, या मोडण्याची त्यांची इच्छा नाही. त्यामुळे राजपुत्राची अशी तपासणी करण्यासाठी मी त्याला मुंबईस आणणार नाही. आमच्यात अशी पद्धत नाही. राजपुत्राची आरोग्यटिपणही आम्ही ठेवलेले नाही. हवे तर राजवैद्यांना बरोबर आणतो."

यावर सयाजीराव शाहू महाराजांना लिहितात, "राजकुमारी इंदुमती बारा वर्षांची झाल्याशिवाय विवाह करता येणार नाही. बारा वर्षाअगोदर मुलीचे लग्न केल्यास बडोद्यातील प्रचलित

कायदा मोडल्यासारखे होईल.” केवळ हुकुमाद्वारे समाजात बदल घडवण्याची राज्यकर्त्यांची मानसिकता रूढ असणाऱ्या काळात स्वत: केलेल्या कायद्याचे काटेकोर पालन करण्याचा सयाजीरावांचा आग्रह त्यांच्यातील लोकशाहीवादी प्रशासकाची साक्ष देतो.

१४ डिसेंबर १९१६ रोजी इंदुमतीदेवींच्या आईंना लिहिलेल्या पत्रात महाराणी लक्ष्मीबाईंनी विवाहासाठीच्या वरपक्षाच्या अटी सविस्तरपणे मांडल्या. या पत्रात महाराणी लक्ष्मीबाई लिहितात, “२ लाख हुंडा, १ लाख वरासाठी एक गाव वतन, १ लाख वधूसाठी एक गाव वतन, १ लाख वधूस दागिने, ७० हजार वाटखर्चासाठी व फक्त व वऱ्हाडी मंडळीचा वरखर्च, असे एकूण ६,७०,००० आपण आम्हास द्यावे. आम्ही तेथे आलो म्हणजे वाहन, भांडीकुंडी, फरासी सामान, मांडव, लाईट सोय ठरल्याप्रमाणे व्हावी. श्रीमन्महाराजसाहेब गायकवाड यांनी मुलीच्या स्त्रीधनाविषयी पत्रात लिहिले. आमच्याकडे कोल्हापूरला ती पद्धत नाही. आपल्यासारख्या थोरांनी आमच्याकडून स्त्रीधनाची इच्छा धरू नये.” सयाजीरावांनी स्त्री धनाची अपेक्षा धरू नये अशी भूमिका या पत्रात शाहू पक्ष घेतो. मात्र हुंड्यासाठी तो टोकाचा आग्रही राहतो ही बाबसुद्धा अचंबित करणारी आहे. विवाह समारंभात वरपक्षाचा मान-पान राखणे आवश्यक असले तरी हुंड्याच्या नावाखाली मोठ्या रकमेची मागणी करणे योग्य नसल्याचे परखड मत सयाजीरावांनी मांडले.

याच दरम्यान ११ जुलै १९१७ रोजी खासेरावांना लिहिलेल्या पत्रात राजर्षी शाहू म्हणतात, “आम्ही मागणी केलेले ६,७०,००० द्यायचे बडोदा महाराजांनी मान्य केले आहे; पण माझी काय इच्छा आहे, हे आपणास सांगितलेच पाहिजे. जर वधू आणि वरास प्रत्येकी आणखी पन्नास हजार दिले तर चांगले दिसेल आणि किरकोळ खर्चासाठी म्हणून तीस हजार रुपये वाढवून द्यावेत. या प्रकारे एकूण आठ लक्ष रुपये होतील. तुमच्याकडे आम्ही मूळ मागणी अकरा लक्ष रुपयांची केली होती, त्याहून हे तीन लाखाने कमीच आहेत. नंतर आम्ही महाराजांना आणखी त्रास देणार नाही, एवढे मिळाल्यास ते अधिक चांगले (look decent) आणि योग्य होईल.”

याच दिवशी सयाजीरावांना पाठवलेल्या मराठी पत्रात शाहू महाराज लिहितात, “इकडून मि. शिरगावकर व खासेराव यांना पत्रे पाठविली आहेत त्यावरून इकडील इच्छा वडिलास श्रुत झाली आहे. त्याचा विचार होऊन आमचे म्हणणे मान्य झाल्याबद्दल उत्तर येईल अशी आशा आहे. फरक फार नाही. मी आपल्या इच्छेबाहेर गेलो नाही व जाण्याची इच्छा नाही; परंतु माझे म्हणण्याबद्दल आपल्याकडून अनुकूल विचार झाला पाहिजे. म्हणजे व्यवहारदृष्ट्या सर्वांना लौकिकास चांगले दिसेल.” या पत्रातील राजर्षी शाहूंचे ‘इकडील इच्छा वडिलास श्रुत झाली आहे’ हे वाक्य सयाजीरावांचे शाहूंच्या जीवनातील वडीलधारे स्थान सिद्ध करते. दुर्दैवाने आजही हा इतिहास ‘कुलूपबंद’

ठेवण्याचा अट्टाहास केला जातो. हा हट्ट आपण सोडला नाही तर पुरोगामी परंपरेचे डबके अधिक विषारी होईल आणि पुढच्या अनेक पिढ्यांना त्याचे नकारात्मक परिणाम भोगावे लागतील याचे भान आपल्या इतिहास संशोधकांना आता ठेवावे लागेल.

राजर्षी शाहूंच्या या पत्राला पाठवलेल्या उत्तरात सयाजीराव लिहितात, "आपण मूळ मागणी केलेल्या सर्व गोष्टी आम्ही मान्य केलेल्या आहेत. आता आपण वाढीव मागणी करत आहात. ते मान्य करणे शक्य नाही. सासरच्या मंडळीने वधूला 'स्त्रीधन' देण्याची पद्धत आहे. आपण याबद्दल काही कळविले नाही." सयाजीरावांच्या या पत्रानंतर शाहू महाराजांनी दोन पत्रे लिहिली. सयाजीरावांना पाठवलेल्या पत्रात राजर्षी शाहू लिहितात, "कोल्हापूर राजघराण्यात स्त्रीधन देण्याची पद्धत नाही. आता आपण नवे प्रश्न उभे करू नये." तर खासेरावांजवळ मन मोकळे करण्यासाठी पाठवलेल्या पत्रात शाहू महाराज लिहितात, "इथे पैसा महत्त्वाचा नाही. सयाजीराव महाराजांच्या या नव्या प्रश्नांनी जुळत असलेला हा नातेसंबंध तुटण्याचा संभव आहे. असे काही झाले तर त्याचे पाप माझ्या माथी बसेल, सगळे मलाच दोष देतील, स्त्रीधनाचा प्रश्न आपण लग्नाच्या वेळी समोरासमोर बडोद्यात निकाली काढू."

राजर्षी शाहूंसारखा क्रांतिकारक समाजधुरीण कुटुंबाच्या प्रतिष्ठेसाठी हुंड्यासारख्या अतिशय छोट्या घटनेला इतकी वर्षे आग्रही महत्त्व देतो ही बाब अचंबित करणारी आहे. कर्मठ

रूढीपरंपरा, खोटी प्रतिष्ठा, जातश्रेष्ठत्वाची भावना यासारख्या बाबींवर मात करण्यात राजर्षी शाहू पूर्ण यशस्वी झाले नव्हते असेच यावरून म्हणावे लागते. शाहूंच्या पुरोगामित्वाचा विचार करता शिवरायांच्या गादीचे वारसदार म्हणून वेदोक्ताच्या निमित्ताने दुखावलेल्या अहंकारामुळे वेदोक्ताचा संघर्ष आणि ब्राह्मणेतर चळवळ यांच्या माध्यमातून ब्राह्मणांवर सूड उगवण्यासाठी शाहू महाराज मृत्यूपर्यंत झुंजत राहिले. परंतु त्यांना ब्राह्मणी वर्चस्वावर पूर्ण विजय मिळवता आला नाही. तसेच परंपरेच्या पगड्यातूनसुद्धा त्यांना पूर्ण मुक्त होता आले नाही असेच दिसते.

याउलट सयाजीरावांनी मात्र ज्ञान, व्यावहारिक शहाणपण, विद्वानांचा सहवास आणि शिवरायांचा गनिमी कावा यांचा अनोखा मेळ घालत होते. १९१५ मध्ये पुरोहित कायद्याद्वारे सर्व हिंदूंना समान धार्मिक अधिकार बहाल करून ब्राह्मणांना शिक्षा करण्याचा अधिकार स्वत:कडे घेऊन सयाजीरावांनी ब्राह्मणी व्यवस्थेला लावलेला 'सुरुंग' पुढच्या अनेक पिढ्यांना प्रेरणादायी ठरेल इतका क्रांतिकारक होता. सयाजीरावांनी प्रतिक्रिया किंवा सूड उगवणे या उद्देशाने कोणतेच काम केले नाही तर समाजातील सर्व घटकांना ज्ञानाधिष्ठित करून अधिक सकारात्मक पद्धतीने समाज उभारणीवर त्यांनी भर दिला हेसुद्धा आपल्याला गंभीरपणे समजून घ्यावे लागेल.

गेल्या ६०-७० वर्षात पुरोगामी परंपरा निर्माण करण्याच्या नावाखाली महापुरुष भक्तीचा 'महासंप्रदाय'

फुले-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात एक चलनी 'नाणे' बनला. या प्रक्रियेत आपण या महापुरुषांना राम आणि कृष्णाप्रमाणे भक्तीसागरात कधी बुडवून टाकले हे लक्षातसुद्धा आले नाही. फुले-शाहू-आंबेडकर या महापुरुषांची फक्त मंदिरे बांधण्याचे काम बाकी आहे इतकी आपली पुरोगामी परंपरा वेगाने भरकटली. परिणामी महापुरुषांच्या मर्यादा स्वीकारण्याचे आत्मबल आपण गमावून बसलो. या सर्व महापुरुषांचा 'पितामह' असणारा 'ऊर्जापुरुष' महाराजा सयाजीराव गायकवाड यांना तर आपण बहिष्कृतच करून टाकले.

महापुरुषांच्या मर्यादा सांगण्याचे धैर्य जर त्या महापुरुषाच्या अनुयायांमध्ये नसेल तर त्या महापुरुषाचा पराभव करण्यासाठी प्रतिपक्षाची गरज लागत नाही. म्हणूनच या विवाहाच्या निमित्ताने हुंड्यासाठी झालेला हा संघर्ष शाहू महाराजांची मर्यादा म्हणून आपण सर्व शाहू अनुयायांनी स्वीकारण्याची गरज आहे. या बाबी झाकून ठेवून इतिहास बदलणार नाही. महापुरुष हाही हाडामासांचा एक जिवंत माणूस असतो याचे भान मुख्यतः संशोधकांनी ठेवणे गरजेचे आहे. महत्त्वाचे म्हणजे किंमत मोजण्याची हिंमत नसेल तर संशोधनाच्या वाटेला न गेलेलेच बरे इतकाच बोध या प्रसंगाच्या निमित्ताने आपण घेऊ शकतो.

प्राचार्य व. वा. देशमुख यांनी फुले-सयाजीराव, शाहू-आंबेडकर हे नवे वैचारिक प्रारूप स्वीकारण्याची गरज व्यक्त केली आहे. त्यांची ही नवी भूमिका महाराष्ट्राने स्वीकारल्यास

महाराष्ट्राच्या अभिमानास्पद इतिहासात भर पडेल. ते म्हणतात, “सक्तीचे प्राथमिक शिक्षण, अस्पृश्यता निवारण, धर्मचिकित्सा, सामाजिक सुधारणांचे कायदे, विविध प्रकारच्या सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, आर्थिक व कृषी सुधारणांच्या बाबतीत केलेले अलौकिक कार्य आणि राजा असूनही आपल्या वर्गीय हिताविरोधी बंड करून स्वातंत्र्य,समता आणि बंधुता या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी झपाटलेल्या सयाजीरावांचे नाव फुले-शाहू-आंबेडकर चळवळीशी निगडित करून त्यांच्या कार्याचा गौरव केला तर ते सत्याशी व इतिहासाशी सुसंगत ठरेल. पुरोगामी चळवळीने या चारही महामानवांच्या ऐतिहासिक कार्याचा विचार करून भविष्यात वाटचाल केली पाहिजे. गंगेचे अलाहाबादचे विस्तीर्ण पात्र पाहताना गंगोत्रीकडे दुर्लक्ष होऊ नये.”

वरील असंख्य पुरावे विचारात घेता फुल्यांच्या नंतर ज्या शाहू महाराजांनी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व केले ते राजर्षी शाहूंचे योगदान वादातीत आहे हे जसे खरे त्याचप्रमाणे शाहू महाराजांच्या कार्याला बडोदा आणि सयाजीरावांकडून मिळालेली प्रेरणा, मार्गदर्शन, नैतिक पाठबळ आणि सहकार्य हे वादळातील दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरले हे सुद्धा आपण दिलदारपपणे स्वीकारण्याची गरज आहे.

●●●

# सयाजी ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक ‘क्रांतीपर्व’ - आंबेडकर
 - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
 - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर
 - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
 - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
 गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
 - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पूरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
 - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद
 - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
 - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
 - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
 - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
 कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
 परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
 - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
 जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
 राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर

४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर

४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर

४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर

४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर

४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड

४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम

४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील

४९) शेतीविकास - देवदत्त कदम

५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड

५१) सहकार विकास - राहुल वणवे

५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर

५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर

५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे

५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे

५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड

५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील

५८) धर्म विचार - बाबा भांड

५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड

६०) छत्रपती शाहू - बाबा भांड

६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे

६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद

६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड

६४) आरक्षण : सायाजीरावांचे आणि शोहुंचे - दिनेश पाटील

६४) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
सयाजी ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com